नियमीत दिवाणी दावा क्र.२२/२०२३,
नि.क्र.४५/४.

**वादीतर्फे सा.क्र.०२ प्रकाश रेशमाजी तरडे यांचा शपथेवर सरतपास**
**वादीतर्फे श्री.डि.यु. कूकडे वकील यांचेकडूनः–**

**०२–** माझ्या शपथपत्रातील मजकुर खरा व बरोबर असून त्यावर माझी सही आहे. शपथपत्र नि.क्र.२० वर आहे. आता मला दस्त क्र.२८६/२०२२ ची प्रमाणीत प्रत दाखविण्यात आली, त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.४६** देण्यात येत आहे.

**उलटतपास प्रतिवादी क्र.९ तर्फे श्री.पी.आर. मोहोळकर वकील यांचेकडूनः–**

**०३–** माझे शिक्षण ईयत्ता सातवी पर्यंत झालेले आहे. मी वाद मिळकतीचा शेतशेजारी नाही. हे म्हणणे बरोबर आहे की, वाद मिळकत ही वादी व प्रतिवादी क्र.९ यांची वडिलोपार्जित मिळकत आहे. हे म्हणणे बरोबर आहे की, त्यांच्यात आजतागायत वाटण्या झालेल्या नाहीत. मी दानपत्रातील मजकुर वाचून पाहीला नाही. मला ग्रामसेवक यांनी दुय्यम निबंधक कार्यालयात बोलाविले होते. हे म्हणणे बरोबर आहे की, दानपत्र खोटे आहे. हे म्हणणे बरोबर आहे की, प्रतिवादी क्र.९ यास नौकरीचे आमिष दाखवून दानपत्र करुन घेण्यात आले आहे. हे म्हणणे बरोबर नाही की, आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

श्रवणोत्तर स्वीकृत,

Digitally signed by YADAV GAJANAN BHANUDAS
Date: 2026.04.29 11:43:52 +0530

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

**( जी.बी. यादव )**,

दि.२९.०४.२०२६

दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर,
गंगाखेड.